# Media Publications of Shankarlal Agrawal Science College, Salekasa

## 2014-15

लोकमत नागपूर, मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०१५

### प्रभावी वक्तृत्व यशस्वी जीवनाचे रहस्य




उपस्थित वाय.टी. रहांगडाले, प्राचार्य खुरसेल व इतर.

**सालेकसा :** हिमालया पब्लिसिंग हाऊस आणि शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शन पार पडले. उद्घाटन प्राचार्य अपर्णा खुरसेल यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पब्लिसिंगचे प्रतिनिधी वाय.टी. रहांगडाले, अरविंद, प्रा. बी.के. नंदेश्वर, प्रा. बी.के. मेंढे आदी मान्यवर उपस्थित होते. माहिती शास्त्र विभागातर्फे महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना ग्रंथाची ओळख व त्यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य खुरसेल यांनी ग्रंथाच्या उपयोगाबद्दल मार्गदर्शन केले. संचालन व आभार प्रदर्शन प्रा. राहुल कवाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी सतिश अग्रवाल, मुकेश कटरे, दीपक नागवंशी, दीपक मेश्राम, रेणुका अग्रवाल आदींनी सहकार्य केले. (शहर प्रतिनिधी)

लोकमत नागपूर, शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०१५

### विद्यार्थ्यांनी मिळविले पर्यावरणाचे ज्ञान

**रेशम उद्योग केंद्राला भेट : जलवर्गीय वनस्पती व त्यांच्या उत्क्रांतीची जाणून घेतली माहिती**



वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाचे विद्यार्थी औषधी वनस्पतींचे निरीक्षण करताना.

**सालेकसा :** प्रताप मेमोरीयल चेरिटेबल ट्रस्ट गोंदियाद्वारे संचालित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसाची शैक्षणिक सहल नवेगावबांध आणि प्रतापगड येथे नेण्यात आली. त्या क्षेत्रात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी औषधीय वनस्पती, जलवर्गीय वनस्पती, रेशीम उद्योग आदी निसर्ग व पर्यावरणाचे ज्ञान मिळविले.

सदर महाविद्यालयातील प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र अशा दोन्ही विज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने सदर उपक्रम राबविण्यात आला. यात विविध प्राण्यांच्या अभ्यासाव्यतिरिक्त जंगलात आढळणाऱ्या विविध औषधीय वनस्पती, इमारती लाकूड, पर्यावरण संरक्षणात उपयोगी वृक्ष व इंधनात उपयोगी वृक्ष यावर मार्गदर्शन करण्यात आले.

त्यानंतर अर्जुनी-मोरगाव येथील भेट दिली. या उद्योगाबद्दल अभ्यास केला व रेशमची प्रक्रिया कशी केली जाते, याची माहिती जाणून घेतली. त्याचबरोबर पुढच्या टप्यात

जलवर्गीय वनस्पती, त्यांची परिस्थिती व उत्क्रांती, औषधीसाठी कशाप्रकारे वनस्पतींचा उपयोग होतो, याबद्दल प्राध्यापकांकडून माहिती मिळवून

सहलीसाठी प्राचार्य डॉ. अर्पणा सुरसेल यांच्या मार्गदर्शनात प्रा. भूमेश मेंढे, प्रा. एम.पी. नंदेश्वर, सुमेध भौतमांगे यांनी सहकार्य केले.